N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म -

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**

प्रथम खबर अहवाल

(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** कोल्हापुर **P.S.(ठाणे):** शिवाजी नगर **Year (वर्ष):** 2019

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0024 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 16/01/2019 04:51 बजे

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** दरमियानी दिन

**Time Period (कालावधी):**

**Date From (दिनांक पासून):** 09/01/2019

**Date To ( दिनांक पर्यंत):** 15/01/2019

**Time From (वेळेपासून):** 13:41 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 14:16 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 16/01/2019 **Time (वेळ):** 01:45 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ**

**Entry No. (नोंद** 005 **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 16/01/2019 02:21 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्तळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):** वायव्य, 3.5 किमी

**Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** कबनूर ग्रामपंचायत चौकामध्ये , कबनूर,हातकणंगले

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नांव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** श्री. गिरीष श्रीपत गोडे

(b) **Father's Name (वडील का नाव) :** श्रीपत गोडे

(c) **Date/Year of Birth (जन्म** 1974 (d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):** **Date of Issue (अदा केल्याची तारीख):**

**Place of Issue (अदा केल्याची ठिकाण):**

(g) **Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

(h) **Address (पत्ता):**

| S.No.(अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | पोलीस उपअधीक्षक,अन्टी कप्शन ब्युरो, कोल्हापूर,करवीर,शिवाजी नगर,कोल्हापुर,महाराष्ट्र, भारत |
| 2 | स्थायी पता | पोलीस उपअधीक्षक,अन्टी कप्शन ब्युरो, कोल्हापूर,करवीर,शिवाजी नगर,कोल्हापुर,महाराष्ट्र, भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल नं.):**

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | संभा शंकर कांबळे | | वडील का नाम : शंकर कांबळे | 1. ग्रामसेवक पट्टणकोडोली ग्रामपंच,राहुल रेसिडेन्सी, ,तेरवाड,,शिरोळ,शिवाजी नगर,कोल्हापुर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | अरविंद आण्णाप्पा धरणगुत्तीकर | | वडील का नाम : आण्णाप्पा धरणगुत्तीकर | 1. गटविकास अधिकारी, ,हातकणंगले पंचायत समिती,हातकणंगले ,शिवाजी नगर,कोल्हापुर,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | आरोपी नं. 1 यांनी सापळ्यावेळी रूपये 25,000/ | 25,000.00 |
| 2 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | आरोपी नं. 2 यांनी सापळ्यापुर्वी रु.10,000/ | 10,000.00 |

10 **Total value of property (In Rs/-)-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):** 35,000.00

11 **Inquest Report / U.D. case No., if any (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12 **First Information contents (प्रथम सूचना तथ्य ):**

फिर्याद ता.15/01/2019मी गिरीश श्रीपत गोडे, वय-52, पोलीस उपअधीक्षक, अन्टी करप्षन ब्युरो, कोल्हापूर, सरकारतर्फे देतो फिर्यादी जबाब असा की, आम्ही दिनांक 04/05/2017 रोजीपासून पोलीस उप अधीक्षक या पदावर अन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर येथे कार्यरत आहे. आम्ही दिनांक 08/01/2019 रोजी कार्यालयात हजर असताना सायंकाळी तक्रारदार श्री.सातापा दत्तात्रय पोवार,रा.व्हन्नुर,ता.कागल हे कार्यालयात हजर झाले. त्यांनी आम्हास आपली ओळख सांगून पट्टणकोडोली,ता.हातकणंगले येथील ग्रामसेवक श्री.एस.एस.कांबळे व श्री. धरणगुत्तेकर, गटविकास अधिकारी,पंचायत समिती, हातकणंगले हे मी पट्टणकोडोली गावामध्ये स्ट्रीट लाईटचे केलेल्या कामाचे बिलाचा चेक काढणेसाठी लाच मागत असलेबाबत आपली तक्रार आहे असे सांगितले. त्याबाबत त्यांचा तक्रारी अर्ज आमचे कडे समक्ष हजर केला. त्यातील मजकूर असा की,मी वरील पत्यावर माझे कुटुंबियांसह राहणेस आहे. माझे व्हन्नुर गावामध्ये सिध्दार्थ लाईट हाऊस नावाचे इलेक्ट्रीक मटेरीयल विक्रीचे दुकान आहे. मी ग्रामपंचायत व इतर षासकीय कार्यालये तसेच खाजगीतील इलेक्ट्रीकल्सची कामे ठेकेदारी पध्दतीने घेऊन ती पुर्ण करून देणेचा देखील व्यवसाय करतो.मी पट्टणकोडोली ग्रामपंचायत मार्फत पट्टणकोडोली गावामध्ये स्ट्रीट लाईट(एल.ई.डी) लाईट बसविणेचे काम सन 2017 मध्ये घेतलेले होते. सदरचे काम मला ग्रामपंचायतकडून कोटेषन पध्दतीने मिळाले होते. नमुद काम मी दि. 09/08/2017 ते दि. 20/09/2017 या कालावधीत पुर्ण केले असुन त्याअंतर्गत एकुण 75 नग एल.ई.डी स्ट्रीट लाईट बसविले आहेत. सदर कामाचे बील रू. 1,55,400/- इतके झाले आहे. सदर बिलाबाबत मी प्रथम ग्रामपंचायत पट्टणकोडोली येथील तत्कालीन ग्रामसेवक एस. पी.कांबळे यांची भेट घेऊन त्यांचेकडे बील सादर केले आहे. परंतु त्यांनी माझे कामाचे बीलाचा चेक काढला नाही. म्हणुन मी बिलाबाबत पाठपुरावा केला. दरम्यान ग्रामसेवक एस.पी.कांबळे यांची बदली झाली व त्यांचे जागी पट्टणकोडोली ग्रामसेवक श्री.एस.एस.कांबळे हे ग्रामसेवक म्हणुन हजर झाले. मी त्यांची भेट घेऊन माझे केलेल्या कामाचे बिलाचा चेक काढणेची विनंती केली. तेव्हा त्यांनी कामाची पाहणी करतो व बिल काढतो असे सांगितले. परंतु त्यांनी बील न काढलेने मी पंचायत समिती हातकणंगले येथील गटविकास अधिकारी श्री. धरणगुत्तीकर यांना गेल्या महिन्यात त्यांचे कार्यालयात

जावुन भेटलो. तेव्हा त्यांनी मी तुझे लाईटचे कामाचे बीलाचा चेक ग्रामसेवक कांबळे यांना सांगून काढून देतो, परंतु मला त्यासाठी रू. 25,000 /- द्यावे लागतील असे सांगितले. तेव्हा मी माझेजवळ असलेले रू. 10,000/- असलेचे सांगितले. त्यांनी ते पैसे आता दे असे सांगितल्याने मी त्यांना रु.10,000/- दिले व उर्वरित पैसे चेक काढलेवर द्या असे त्यांनी सांगितले. त्यानंतर देखील अद्यापपर्यंत माझे बिल मिळालेले नाही, म्हणुन मी पुन्हा ग्रामसेवक एस.एस.कांबळे यांना आज दि. 08/01/2019 रोजी भेटलो व बिलाचा चेक काढणेसाठी विनंती केली, तेव्हा त्यांनी सदरचा चेक काढणेसाठी प्रथम माझेकडे कामाचे रक्कमेचे 25% रक्कम मागितली. तेव्हा मी त्यांना सदरची रक्कम फार होते असे सांगितले असता, त्यांनी रू.25,000/- दे, मगच मी तुझा चेक काढतो असे सांगितले. तेव्हा मी त्यांना ठीक आहे, पैशाची व्यवस्था करून येतो असे सांगितले. तेव्हा ग्रामसेवक कांबळे यांनी मला, उद्या इंगळी गावचे ग्रामपंचायत कार्यालयात येवून भेटा, येणेपुर्वी मला फोन करुन या असे सांगितले. त्यानंतर मी तेथुन निघून आलो.तरी मी पट्टणकोडोली ग्रामपंचायत मार्फत पट्टणकोडोली गावामध्ये स्ट्रीट लाईट(एल.ई.डी) लाईट 75 नग बसविणेचे काम दि. 09/08/2017 ते दि. 20/09/2017 या कालावधीत पुर्ण केले असून केलेल्या कामाचे रू.1,55,400/- इतक्या रक्कमेच्या बिलाचा चेक काढणेसाठी ग्रामसेवक पट्टणकोडोली एस.के.कांबळे रू. 25,000/- लाच म्हणुन मागत आहेत. तसेच पंचायत समिती, हातकणंगले येथील गटविकास अधिकारी धरणगुत्तीकर यांनी देखील मला माझे कामाचे चेक काढणेसाठी रू.25,000/- लाच मागणी केली असून त्यापैकी रु.10,000/- माझेकडून स्विकारले आहेत. परंतु त्यांना लाच देणेची माझी इच्छा नाही. तरी त्यांचेवर आपलेकडून कारवाई होणेस विनंती आहे. यासोबत मी अर्जासोबत पट्टणकोडोली ग्रामपंचायत येथे स्ट्रिट लाईट बसविणेच्या कामाबाबत सादर केलेले कोटेशन, इलेक्ट्रीक मटेरियल सप्लाय केलेबाबत पोहोच मिळालेल्या पावत्या तसेच केलेल्या कामाबाबत पट्टणकोडोली ग्रामपंचायत येथे दिलेले बिल यांच्या छायांकीत प्रती आपणाकडे हजर केलेल्या आहेत --- अशा मजकूरचा तक्रार अर्ज आहे. तक्रारदार यांचेकडे ग्रामसेवक कांबळे यांनी लाच मागितलेवर तक्रारदार यांनी त्यांना पैशाची तयारी करुन येतो असे सांगितले असता, ग्रामसेवक कांबळे यानी.उद्या इंगळी गावचे ग्रामपंचायत कार्यालयात येवून भेटा, येणेपुर्वी मला फोन करुन याअसे सांगितलेचे तक्रारीत नमुद आहे. त्यानुसार आम्ही दि.09/01/2019 रोजी ग्रामसेवक कांबळे यांचे लाच मागणीबाबत पडताळणीचे आयोजन करणेचे ठरविले. तेव्हा तक्रारदार यांनी मी इलेक्ट्रीक मटेरियल देणेसाठी उदईक रोजी सरनोबतवाडी येथे येणार आहे. मी मटेरियल देवून तुम्हाला पुणे-बेंगलोर हायवे रोडवर सरनोबतवाडी पुलाजवळ सकाळी 11.30 वा.पर्यंत येवून भेटतो असे सांगितले. त्याप्रमाणे तक्रारदार यांना हजर राहणेची समज देवून त्यांना परत पाठवून दिले.आम्ही लागलीच सहाय्यक नियंत्रक, वैधमापन शास्त्र, कोल्हापूर जिल्हा,कोल्हापूर यांचेकडे वर्ग 3 चे 2 कर्मचारी मिळणेबाबत सायंकाळी पत्र पाठविले. त्यानुसार त्यांचे कार्यालयाकडून दोन कर्मचारी दि.09/01/2019 रोजी सकाळी 09.00 वा. आमचे कार्यालयात पाठवित आहोत असे कळविणेत आले.दि.09/01/2019 रोजी श्री.श्रीमंत मल्लाप्पा बजंत्री, क्षेत्र सहाय्यक, निरीक्षक वैधमापन शास्त्र,शिरोळ विभाग, शिरोळ, (2) श्री.दिलीप सुदाम नाईकनवरे, क्षेत्र सहायक, निरीक्षक वैधमापन शास्त्र,कागल विभाग, कागल हे 2 कर्मचारी पंच म्हणून आमचे कार्यालयात हजर झाले. आम्ही त्यांना आमचेकडील गोपनिय कामामध्ये पंच म्हणून काम करण्यास तयार आहात काय? याबाबत विचारणा केली असता त्यांनी सहमती दर्शविली. त्यानंतर आम्ही,दोन्ही पंच व सापळा पथकातील कर्मचारी असे सापळा कारवाईस आवश्यक ते साहित्य घेउन 11.00 वा.एसीबी कार्यालयापासून शासकीय टाटा सुमो गाडी नंबर-डभ्.09ध्।ळ.167 यातून पुणे-बंेगलोर हायवे रोडवर सरनोबतवाडी पुलाजवळ आलो. त्यावेळी तक्रारदार श्री.पोवार त्यांचेकडील टाटा इंडीका व्हीस्टा कार नंबर-डभ्.09ध्ठड.1131 यातून आमचे गाडीजवळ आले व आम्हास भेटले. तेव्हा तक्रारदार यांनी त्यांना काल रोजी ग्रामसेवक कांबळे यांनी,उद्या सकाळी इंगळी गावातील ऑफिसमध्ये भेटणेस या, परंतू येणेपुर्वी मला फोन करुन या असे सांगितले आहे. त्यामुळे आपण येथे न थांबता इंगळी गावाजवळ जावून तेथे कामाबाबत चर्चा करु या असे सांगून त्यांचे कारचे पाठोपाठ येणेस सांगितले. म्हणून आम्ही त्यांचे पाठोपाठ तेथून पट्टणकोडोली मार्गे इंगळी गावाकडे जाणारे रस्त्याने जाणेस निघालो. तक्रारदार यांनी त्यांची कार इंगळी गावाचे अलीकडे रस्त्याकडेला झाडाखाली थांबविली. तेव्हा त्यांना आम्ही आमचेजवळ बोलावून गाडीमध्ये बसवून घेतले.आम्ही तक्रारदार श्री.पोवार यांची तसेच दोन्ही पंच व आमचे सोबत असलेला स्टाफ यांची आपसात ओळख करुन दिली. त्यानंतर तक्रारदार श्री.पोवार यांनी त्यांची तक्रार पंचांना सांगितली. त्यानंतर आम्ही तक्रारदार यांनी आमचेकडे दिलेला त्यांचा तक्रारी अर्ज पंचांना वाचणेस दिला. तो अर्ज वाचुन त्या अर्जातील मजकूर व तक्रारदार यांनी सांगीतलेली तोंडी तक्रार एकच असलेची पंचांची खात्री झाली. तेव्हा आम्ही तक्रारदार यांना ग्रामसेवक कांबळे यांचे मोबाईल फोनवर फोन करणेस सुचना दिली. त्याप्रमाणे तक्रारदार श्री.पोवार यांनी त्यांचेकडील मोबाईलवरुन ग्रामसेवक कांबळे यांचे मोबाईल फोनवर फोन केला असता, कांबळे यांनी त्यांना मी हातकणंगले पंचायत समिती कार्यालयामध्ये आहे, तेथे या असे सांगितले. त्यामुळे आम्ही हातकणंगले जवळ जावून तेथे तक्रारदार यांचेकडे डिजीटल व्हाईस रेकॉर्डर चालू करुन देवून तेथून त्यांना पंच श्री.बजंत्री यांचेसोबत हातकणंगले पंचायत समिती कार्यालयामध्ये ग्रामसेवक कांबळे व गटविकास अधिकारी धरगुत्तीकर यांची भेट घेणेस पाठविणेचे ठरविले. त्यानुसार आम्ही दोन्ही पंच व स्टाफसह आमचेकडील शासकीय वाहनातून व तक्रारदार त्यांचेकडील वाहनातून इंगळी येथून रुई-अतिग्रे फाटा मार्गे कोल्हापूर-सांगली रोडने हातकणंगले गावातून पेठवडगांवकडे जाणारे रस्त्यावर आलो. तेथून आम्ही तक्रारदार व दोन्ही पंचांना ग्रामसेवक कांबळे व गटविकास अधिकारी धरणगुत्तीकर हे तक्रारदार यांचेकडे लाचेची मागणी करतात अगर कसे? याबाबत प्रथम पडताळणी करणार आहोत असे सांगून व योग्य त्या सुचना देवून पडताळणीकरीता तक्रारदार यांचेकडे डिजीटल व्हाईस रेकॉर्डर चालु करुन देवून तक्रारदार व त्यांचेसोबत पंच नं.1 श्री.बजंत्री यांना आम्ही थांबलेल्या ठिकाणापासून पंचायत समिती हातकणंगले येथे ग्रामसेवक कांबळे व गटविकास अधिकारी धरणगुत्तीकर यांची भेट घेण्यासाठी 13.41 वा.पाठविले. ते पंचायत समिती हातकणंगले येथे ग्रामसेवक कांबळे व गटविकास अधिकारी धरणगुत्तीकर यांची भेट घेवून आम्ही थांबलेल्या ठिकाणी 14.39 वा. परत आले. एकंदरीत आरोपी लोकसेवक संभा षंकर कांबळे,वय-48,ग्रामसेवक पट्टणकोडोली ग्रामपंचायत,ता.हातकणंगले, रा. राहूल रेसिडेन्सी, तेरवाड, ता. षिरोळ यांनी आपले लोकसेवक पदाचा दुरुपयोग करुन भ्रष्ट व बेकायदेषीर मार्गाने स्वतःचा आर्थिक लाभ करुन घेण्याचे उद्देषाने वैधपारिश्रमिकाखेरीज अन्य परितोशण म्हणून तक्रारदार यांचेकडे त्यांना पट्टणकोडोली ग्रामपंचायतमार्फत पट्टणकोडोली गावातील स्ट्रिट लाईट बसविलेल्या कामाचे बिलाचा चेक काढणेसाठी रु.25,000/- लाच रक्कम मागणी करुन स्विकारलेने रंगेहात पकडले आहे.तसेच अरविंद आण्णाप्पा धरणगुत्तीकर, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, हातकणंगले यांनीही आपले लोकसेवक पदाचा दुरुपयोग करुन भ्रष्ट व बेकायदेषीर मार्गाने स्वतःचा आर्थिक लाभ करुन घेण्याचे उद्देषाने वैधपारिश्रमिकाखेरीज अन्य परितोशण म्हणून तक्रारदार यांना पट्टणकोडोली ग्रामपंचायतमार्फत मिळालेल्या पट्टणकोडोली गावातील स्ट्रिट लाईट बसविलेल्या कामाचे बिलाचा चेक ग्रामसेवक यांचेमार्फत काढून देणेसाठी म्हणून यापुर्वी रु. 10,000/- लाच रक्कम स्विकारलेचे मान्य करुन बीलाचा अंतिम चेक मिळालेवर स्वइच्छेने आणखी लाच रक्कमेची मागणी केली आहे. त्यामुळे यातील आरोपी लोकसेवक संभा षंकर कांबळे, ग्रामसेवक पट्टणकोडोली ग्रामपंचायत,ता.हातकणंगले व अरविंद आण्णाप्पा धरणगुत्तीकर, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, हातकणंगले यांनी लाचलुचपत प्रतिबंधक अधिनियम सन 1988 (सुधारणा 2018)चे कलम 7 अन्वये गुन्हा केलेने त्यांचेविरुध्द सरकारतर्फे आमची कायदेशीर फिर्याद आहे.

13.**Action** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at**
**(केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)**

(1) **Registered the case and took up the investigation: (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):** irgaunda satgaunda patil (I (Inspector)) / pi **or**

(2) **Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे** **Rank (पद):**

**No.(क्र.):** **to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or**

(3) **Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार**

**or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)**

(4) **Transferred to P.S.(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (जिल्हा):**

**on point of jurisdiction (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .**

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)**

**R.O.A.C.(आर. ओ .ए .सी.)**

14.**Signature/Thumb impression of the complainant / informant.(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):**

15.**Date and time of dispatch to the court (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**

**Signature of Officer in charge, Police Station (ठाणे प्रभारी अधिका-याची**
**Name (नाम):** irgaunda satgaunda patil
**Rank(पद):** I (Inspector)
**No.(सं.):** pi

**Attachment to item 7 of First Information Report** (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र):
**Physical features, deformities and other details of the suspect/accused: ( If known /** (संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्टये, व्यंग आणि इतर तपशील))

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म | Build (बांधा) | Height (cms.) (उंची | Complexion (रंग) | Identification Mark(s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |
| 2 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा/बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)